दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक २५८ | MAHMAR/2006/17212 | रायगड | मंगळवार, दि.१६ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## नातेवाईकांनी मारला दागिन्यांवर डल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाइकांनी दागिने चोरून नेल्याची घटना विचुंबे येथे घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक त्यांच्या घरी आले होते. त्यांनी जेवण करून घरी मुक्काम केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी राधिका उठल्या असता त्यांना घरातील साहित्य विस्कटलेले दिसले. रोख रक्कम १५ हजार, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मोबाईल, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड सापडून आले नाहीत.

त्यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पनवेलसह २९ महानगरपालिकांच्या निवडणुका जाहीर

## १५ जानेवारीला मतदान, तर १६ जानेवारीला लागणार निकाल ; आचार संहिता लागू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत मोठी घोषणा केली आहे. राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकींची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. पनवेल, मुंबई, ठाण्यासह राज्यातील २९ महानगर पालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. १५ जानेवारीला सर्व महापालिकांसांठी मतदान पार पडणार आहे, तर १६ जानेवारीला निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.




आजच्या पत्रकार परिषदेत मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्यासाठी करण्यात आलेली कार्यवाही याबाबतची माहिती देण्यासाठी घेण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या संदर्भात ही पत्रकार परिषद असून २९ पैकी २७ महापालिकेची मुदत संपलेली आहे. तर ५ महापालिकेची मुदत २०२० मध्येच संपलेली होती. तसेच १८ महापालिकांची मुंबईसह २०२२ मध्ये मुदत संपलेली होती. तसेच ४ महापालिकांची मुदत ही २०२३ मध्ये संपलेली आहे, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

राज्यातील २९ महानगरपालिका क्षेत्रात आजपासून निवडणुकीची आचारसंहिता लागू होणार असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

दुबार मतदारांना रोखण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत याबाबत बोलताना राज्य निवडणूक आयुक्तांनी सांगितलं की, या निवडणुकीसाठी संभाव्य दुबार मतदाराची ओळख केलेली आहे. संभाव्य दुबार मतदारांच्या नावासमोर डबल स्टार असं मार्क करण्यात आलं आहे. या मतदारांच्या संदर्भात महापालिका आयुक्तांच्या मार्फत संभाव्य दुबार मतदारांच्या घरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आलं आहे. तसेच दुबार मतदारांना विचारून तो कुठल्या मतदान केंद्रावर मत देईल हे लिहून घेण्यात आलं आहे. त्या मतदान केंद्राव्यतिरिक्त त्याला इतर कुठेही मतदान करू दिलं जाणार नाही, असं राज्य निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केलं आहे.

गेल्या काही महिन्यांपासून राजकीय आरोप-प्रत्यारोप, न्यायलयीन लढा आणि सरतेशेवटी ३१ जानेवारीच्या अंतिम मुदतीचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यामुळे चर्चेत असलेल्या राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुका आज अखेर राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केल्या आहेत. १५ जानेवारीला राज्यातील मुंबई, ठाण्यासह एकूण २९ महानगरपालिकांसाठी मतदान होणार असून १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केले जाणार आहेत.

### निवडणूक कार्यक्रम ?

नामनिर्देशन पत्र स्वीकारण्याचा कालावधी - २३ ते ३० डिसेंबर
नामनिर्देशन पत्र छाननी - ३१ डिसेंबर २०२५
उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत - २ जानेवारी २०२६
निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवार यादी - ३ जानेवारी २०२६
मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडेल.
निवडणूक निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी लागेल.

# ३२५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन





**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलचे झपाट्याने नागरीकरण होत असून हे क्षेत्र एज्युकेशन हब म्हणून पुढे येत आहे. पनवेल महापालिकेचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पनवेल महापालिका दत्तक घेतली आहे. त्यामुळे यापुढेही नागरिकांचे प्रश्न मार्गी लावतानाच विकासाची गंगा अविरतपणे सुरू राहील, अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी आज येथे दिली.

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३२५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पनवेल येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात मार्गदर्शनात्मक कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, आरपीआयचे प्रभाकर कांबळे यांच्यासह माजी नगरसेवक, माजी नगरसेविका उपस्थित होते.

पिसार्वे तलाव पुनजिवीत व सुशोभिकरणाचा लोकार्पण, कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे लोकार्पण, खारघर सेक्टर-१९ मधील भूखंड क्र.१४ येथे प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, सेक्टर-३६ मधील भूखंड क्र. १३ येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र लोकार्पण, कळंबोली सेक्टर-०८ मधील सन शाईन सोसायटी पर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे लोकार्पण, सेक्टर-०८-ई मधील भूखंड क्र. ६, ७ व ८ येथील प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, कामोठे सेक्टर-११ मधील भूखंड क्र. १-बी येथील प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, नवीन पनवेल सेक्टर-१८ मधील भूखंड क्र. ८-अ, ८-ब या भूखंडावर उभारण्यात येणाऱ्या माता व बालसंगोपन केंद्राचे भूमिपूजन, पनवेल बसस्थानकामागे येथे प्रधानमंत्री आवास योजना व मुख्यमंत्री आवास योजनेतंर्गत कुष्ठरोग पिडीतांसाठी व खुल्या विक्रीसाठी प्रस्तावित गृह प्रकल्पाचे भूमिपूजन, तक्का येथे डोमिनोज समोरील मोकळी जागा येथे कोळी समाजाचे शिल्पचे लोकार्पण, पनवेल महानगरपालिका हद्दीतील लायन्स गार्डन ते पी.डब्ल्यू.डी. ऑफीस ते जुने कोर्ट ते बंदर नाका कॉंक्रीटीकरण रस्त्याचे भूमिपूजन, लोकनेते दि.बा. पाटील शाळा येथे लोकनेते दि. बा. पाटील यांच्याबद्दल माहिती दर्शविणारे म्युरल व सुशोभित कक्षाचे लोकार्पण, प्रभाग समिती- ड येथील भूखंडावर व्यावसायिक दुकाने बहुमजली वाहनतळाच्या कामाचे भूमिपूजन झाले.

## तलाठी, मंडळाधिकारी यांचे आंदोलन, आयटी उपकरणांसाठी ऑनलाईन कामावर बहिष्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने दिनांक १५ डिसेंबर २०२५ पासून सर्व ग्राम महसूल व मंडळ अधिकारी आपली डिजिटल सिग्नेचर (डीएससी) तहसील कार्यालयात जमा करून संपूर्ण ऑनलाइन कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. उरण तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारीही हा निर्णय अंमलात आणणार आहेत.

उरण तालुका तलाठी संघाने तहसिलदार डॉ उद्धव कदम यांना निवेदन सादर करून ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्याकडे असलेली आयटी उपकरणे बदलून नवीन लॅपटॉप तसेच प्रिंटर-कम-स्कॅनर तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. सध्या असलेली उपकरणे जीर्ण व निकामी झाली आहेत. त्यामुळे कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचे नमूद केले आहे. दरम्यान, या बहिष्कार आंदोलनामुळे ७/१२, ८-अ, दाखला प्रणाली, ई-पीक पाहणी नोंदणी, ई-फेरफार इत्यादी महत्त्वाच्या ऑनलाइन सेवांवर तात्पुरता परिणाम होणार आहे. तलाठी संघाची या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांना सातत्याने होणारा त्रास पाहाता संघाने ऑनलाइन कामकाजावर बहिष्काराचा निर्णय घेतला आहे



## नाताळ व नवीन वर्षांच्या पार्श्वभुमीवर बनावट मद्य वाहतुकीवर पनवेल परिसरात कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नाताळ व नवीन वर्षांच्या पार्श्वभुमीवर बनावट मद्य वाहतुकीवर पनवेल परिसरात राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभागाने कारवाई करून जवळपास चार चाकी गाडीसह एकूण २,५८,१२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून याप्रकरणी एकाला ताब्यात घेतले आहे.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई राजेश देशमुख, संचालक, अंमलबजावणी व दक्षता, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई, प्रसाद सुर्वे, विभागीय उप-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे प्रदीप पवार, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, रायगड-अलिबाग रविकिरण कोले, यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पनवेल ग्रामीण विभाग यांनी तळोजा पोलिस स्टेशन हद्दीत शिवम अपार्टमेंट सेक्टर १६, फेज २, घोटगाव रोडवर तळोजा येथे दारुबंदी गुन्ह्याकामी सापळा रचुन एका चारचाकी वाहनामध्ये बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रॅंडच्या १४४ बाटल्या व ०१ चारचाकी वाहन असा एकूण २,५८,१२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे जयवंत भोईर यास ताब्यात घेतले त्याच्याकडे सदर मद्याबाबत चौकशी केली असता त्याने सदरचे मद्य हे जवळच असलेल्या फ्लॅटमधून आणले असे सांगितले त्यानुसार त्या ठिकाणी जाऊन छापा टाकून बनावट विदेशी मद्याच्या वेगवेगळ्या ब्रॅंडच्या २५० बाटल्या असा एकुण रू.८०,२७०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

सदर दोन्ही ठिकाणी मिळून एकूण ३३८३९०/- इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपी जयवंत भोईर वय ३८ वर्षे या इसमावर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अन्वये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली आहे.



### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील तिसऱ्या धावपट्टीच्या....

## तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यासासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सिडकोकडून सुरू



**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर (NMIA) तिसऱ्या समांतर धावपट्टीच्या विकासासाठी सविस्तर तांत्रिक-व्यावसायिक व्यवहार्यता अभ्यास करण्याकरिता सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया सिडकोने सुरू केली आहे. या अभ्यासासाठी नामांकित व पात्र स्वतंत्र संस्था तसेच संयुक्त उपक्रम/संघटनांकडून निविदा मागविण्यासाठी प्रस्ताव मागणी (Request for Proposal - RFP) तयार करण्यात आली आहे.

सध्या मुंबई आणि मुंबई महानगर प्रदेशाला (MMR) मुख्यत्वे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (CSMIA) सेवा देत असून, त्याची प्रवासी हाताळणी क्षमता सुमारे ५० ते ५५ दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष (MPPA) इतकी मर्यादित आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर, मुंबई व नवी मुंबई येथील विमानतळांद्वारे सुमारे १५० MPPA क्षमतेची नियोजित बहुविमानतळ व्यवस्था कार्यान्वित होणार आहे. यामध्ये CSMIA ची क्षमता ५०-५५ MPPA तर NMIA ची क्षमता ९०-९५ MPPA इतकी असेल. NMIA चे आगामी विस्तार टप्पे आणि CSMIA येथील क्षमतेत वाढ यांद्वारे मध्यम कालावधीतील वाढती मागणी पूर्ण करण्यात येणार असली, तरी २०३७ नंतरच्या दीर्घकालीन हवाई वाहतूक मागणीसाठी NMIA वरील तिसऱ्या धावपट्टीसारख्या अतिरिक्त पायाभूत सुविधांचा विचार करण्यात येत आहे.

सुमारे १,१६० हेक्टर क्षेत्रावर विकसित होत असलेला नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरवर्षी ९० दशलक्ष प्रवासी आणि ३.२ दशलक्ष टन माल-वाहतूक हाताळण्याच्या क्षमतेसह नियोजित आहे. या विमानतळावर एकाच वेळी स्वतंत्रपणे कार्य करू शकणाऱ्या दोन समांतर धावपट्ट्या तसेच परस्पर जोडलेल्या चार प्रवासी टर्मिनल्सची उभारणी करण्यात आली आहे. यामध्ये टर्मिनल-१ ची क्षमता २० MPPA, टर्मिनल-२ ची ३० MPPA, तर टर्मिनल-३ आणि टर्मिनल-४ प्रत्येकी २० MPPA इतकी आहे. त्यामुळे एकूण टर्मिनल क्षमता ९० MPPA इतकी आहे. हे विमानतळ पाच टप्प्यांत विकसित करण्यात येत असून, पहिला व दुसरा टप्पा (२० MPPA क्षमता) २५ डिसेंबरपासून देशांतर्गत उड्डाणांच्या प्रारंभासाठी सज्ज आहे. पुढील टप्प्यांमध्ये २०२९ पर्यंत क्षमता ५० MPA-, २०३२ पर्यंत ७० MPPA आणि २०३७ पर्यंत ९० MPPA इतकी वाढविण्यात येणार आहे.

> ही पायरी सिडकोच्या दूरदृष्टीपूर्ण पायाभूत सुविधा नियोजनाची साक्ष देणारी असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास हा परिसराच्या दीर्घकालीन वाढीच्या आणि विकासाच्या गरजांशी सुसंगतपणे सुरू राहील, याची खात्री यामुळे होणार आहे.
>
> **विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

# कोट्यवधी रुपयांची अफरातफर

जगात असा कोणता देश आहे, जिथे भ्रष्टाचार नाही? अर्थातच जगात कोणताही देश धुतल्या तांदळाचा नाही. ज्या देशामध्ये गुन्हेगारांवर आत्यंतिक कडक कारवाई केली जाते, असे देशही भ्रष्टाचार रोखू शकलेले नाहीत. बरं, भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई तरी कोणती होते? बऱ्याचदा आणि बऱ्याच देशांमध्ये अशा भ्रष्टाचाऱ्यांवर कडक कारवाईच होत नाही किंबहुना असे लोक खुलेआम फिरतात, कारण त्यांच्यावरचे आरोपच सिद्ध होऊ शकत नाहीत. सिद्ध झाले तर त्यांच्यावरची कारवाईदेखील नाममात्रच असते. गुन्हेगारांना कायमचं वठणीवर आणणारे आणि त्यांना दिलेल्या शिक्षा पाहून असे काही करण्याची कोणाची छाती होणार नाही, अशा देशांमध्ये काही आखाती देशांचा आणि चीनचा समावेश होतो. गुन्हेगारांना आत्यंतिक कडक शिक्षा करण्याविषयी आणि त्यासंदर्भातले सर्व नियम धाब्यावर बसविण्याबाबत या देशांची ख्याती आहे. चीनमध्ये नुकताच असाच एक प्रकार पुन्हा एकदा घडला आहे. ही घटना सध्या जगभर गाजते आहे. चीनमधील 'चायना हुआरोंग इंटरनॅशनल होल्डिंग्स' (सीएचआयएच) या सरकारी ॲसेट मॅनेजमेंट फर्मचे माजी जनरल मॅनेजर बाई तियानहुई यांच्याशी संबंधित हे प्रकरण आहे. मोठ्या पदावर असलेल्या बाई यांनी पदाच्या माध्यमातून जेवढा पैसा लाटता येईल तेवढा लाटला आणि स्वतःचं उखळ पांढरे करून घेतलं. २०१४ ते २०१८ दरम्यान प्रोजेक्ट्सचं अधिग्रहण आणि आर्थिक फायदा करून देण्याच्या बदल्यात त्यांनी तब्बल १५६ दशलक्ष डॉलरहून जास्त लाच घेतल्याचा त्यांच्यावर आरोप होता. या आरोपाखाली त्यांना दोषी ठरवलं गेलं. त्यांनी भ्रष्टाचार केल्याचं सिद्ध झाल्यानंतर या बँकरला चीननं थेट मृत्युदंड दिला. खरं तर भ्रष्टाचाराविरोधात चीनमधील कायदे अतिशय कडक असले तरी बऱ्याचदा भ्रष्टाचाऱ्याला थेट मृत्युदंड दिला जात नाही. त्याच्याविरोधातला आरोप सिद्ध झाल्यानंतर दोन वर्षांनी त्याला मृत्युदंड दिला जातो आणि नंतर त्याची मृत्युदंडाची शिक्षा जन्मठेपेत बदलली जाते. आजपर्यंत अनेकदा असं झालं आहे आणि गुन्हेगारांना दिलासा मिळाला आहे. आता मात्र चिनी सरकार आणि न्यायालयाने भ्रष्टाचाऱ्यांना कुठल्याही परिस्थितीत माफ न करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो आहे. त्यामुळेच या बँकरला थेट मृत्युदंड देण्यात आला आहे. बाई यांना पहिल्यांदा मे २०२४ मध्ये उत्तरेतील तियानजिन शहरातील न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. ती निलंबित केली जाईल असं बाई, यांच्या नातेवाइकांना वाटत होतं, पण ही शिक्षा निलंबित करण्यात आली नाही. हुआरोंग या फर्मचे इतरही अनेक अधिकारी भ्रष्टाचार प्रकरणात अडकले आहेत. 'सीएचआयएच' ही चायना हुआरोंग ॲसेट मॅनेजमेंटची सबसिडियरी आहे, जी देशातील सर्वात मोठ्या ॲसेट मॅनेजमेन्ट फंड्सपैकी एक आहे. याच फर्मचे माजी चेअरमॅन लाई शियाओमिन यांनाही जानेवारी २०२१ मध्ये २५३ दशलक्ष डॉलरची लाच घेतल्याप्रकरणी फाशी देण्यात आली होती. बाई यांनी शिक्षेविरोधात अपील केलं; पण फेब्रुवारीमध्ये आधीचाच निर्णय कायम ठेवला गेला. चीनच्या सर्वोच्च न्यायालयानं शिक्षा कायम ठेवताना सांगितलं की बाई यांचे गुन्हे 'अत्यंत गंभीर' आहेत. बाई यांना त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना भेटू दिल्यानंतर तियानजिनमध्ये फाशी देण्यात आली.

# भारत गॅसच्या नव्या नियमांचा नागरिकांना फटका

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात भारत गॅसने अचानक लागू केलेल्या नव्या नियमांमुळे रोहा शहर तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. गॅस संपल्यानंतर तात्काळ बुकिंग करूनही सिलेंडर वेळेवर न मिळाल्याने ग्रामीण भागातील महिलांमध्ये प्रचंड नाराजी उमटली आहे. अनेक गृहिणींना सिलेंडरची गाडी दाराशी आल्यानंतरही नवीन नियमामुळे रिकाम्या हाताने परतावे लागले.

स्थानिक महिलांनी सांगितले की, आम्हाला कोणतीही माहिती न देता नवा नियम लावला. आम्ही बुकिंग केलेलं असूनही गॅस परत जातोय. यापूर्वी सिलेंडर मिळत होते परंतु असे अचानक नवे नियम लावले तसेच कोणतीही पुर्व कल्पना दिलेली नाही त्यामुळे घरात सयंपाकच होऊ शकत नाही अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. या परिस्थितीने शाळकरी मुलांचे डबे, रोजंदारी कामगारांचे स्वयंपाक आणि घरातील दैनंदिन कामे विस्कळीत होत आहेत.

१५ दिवसांच्या या नियमाबाबत नागरिकांची मोठी तक्रार म्हणजे गॅस कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देणे. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबे पूर्णपणे गोंधळात पडली आहेत. घराघरांत गॅस संपल्याने स्वयंपाकाचे संकट निर्माण झाले असून अनेकांना पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे.

दरम्यान, या संदर्भात भारत गॅसचे वितरक शकील अधिकारी यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की भारत गॅस कंपनीने नवे नियम लागू केले असून त्यानुसारच आम्ही सिलेंडर वितरण करतोय. ग्राहकाने जर महिन्याच्या १ तारखेला सिलेंडर घेतले असेल, तर पुढचे बुकिंग तो केवळ १५ दिवसांनंतरच करू शकतो. त्याआधी केलेले बुकिंग स्वीकृतीत येत नाही. आम्ही व्हाट्सअप मेसेज द्वारे तसेच नव्या नियमाचे बॅनर लावण्यात येणार आहेत तसेच, सिलेंडर देताना ग्राहकाच्या मोबाईलवर आलेला ओटीपी दिल्यानंतरच सिलेंडर सुपूर्द केला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. आमची सेवा सुरळीत सुरू आहे असा दावा अधिकारी यांनी केला. तसेच ज्यांना डबल सिलेंडर हवा असेल, त्यांनी तात्काळ कार्यालयात कागदपत्रे देऊन रुपये ३२७० भरून दुसरा सिलेंडर घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. नियमांचे पालन आवश्यक असले तरी, नागरिकांना पूर्वकल्पना न दिल्याने निर्माण झालेला गोंधळ लक्षात घेऊन गॅस कंपनीने तातडीने जनजागृती करावी व गोरगरिबांच्या अडचणी कमी करण्यासाठी तात्पुरते उपाय करावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.



# माणगाव पंचायत समितीमध्ये समता सप्ताह साजरा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव पंचायत समिती जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून समता सप्ताह/ समान संधी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माणगाव तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे पालक, पंचायत समिती विस्तार अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी ,केंद्रप्रमुख, विशेष शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघमारे सर व प्रास्ताविक डांगे मॅडम यांनी केले.

तालुक्यातील १७ दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार प्राप्त झालेले साहित्य साधने व उपकरणे यांचे वाटप माणगाव पंचायत समिती येथील पंचायत समिती विस्तार अधिकारी चांदोरकर, आरोग्य विस्तार आंब्रे, शिक्षण विस्तार अधिकारी खामकर सर, शिक्षण विस्तार अधिकारी पालांडे सर व केंद्रप्रमुख निकम सर यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले. यावेळी पंचायत समिती मधील उपस्थित सर्व अधिकारी यांनी त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या योजनांची माहिती दिली व मोलाचे मार्गदर्शन केले. शासनाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या योजनांबाबत माहिती श्रीमती स्नेहल पाटील मॅडम व गायकवाड मॅडम यांनी दिली.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड – ४१० २०६**
E-mail- panvel.eemahapwd.gov.in
**दूरध्वनी क्रमांक ०२२–२७४५२७७८ फॅक्स – ०२२–२७४६७४४०**
**ई– कार्यप्रणाली अंतर्गत ई–निविदा क्र. ४१ (ई–निविदा) सन २०२५–२६**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२–२७४५२७७८ फॅक्स–०२२–२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी–१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई–निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप– या निविदेमध्ये एकूण ०५ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १६.१२.२०२५ सकाळी १०.०० ते दिनांक २३.१२.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.
www.mahatenders.gov.in

ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :–
क्र.आरओसी २०२५–२६/क्र.५/सी ४६०५

**सही/–**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे. रॉयल होम एंटरप्राइजेस, त्यांच्या भागीदारांमार्फत १) श्री. नौमान मोहम्मद अमीन पटेल २) श्री. नियाज अहमद अब्दुल वहाब पटेल, पत्ताः प्लॉट क्र. १४, सेक्टर ०४, तळोजा जिल्हा रायगड, हे खालील वर्णनाचा भुखंड मे. रॉयल होम को–ऑप–हाऊसिंग सोसायटी (नियोजित) च्या नावे हस्तांतरित करत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**संचिका क्र. १०७२, प्लॉट क्र. १४, सेक्टर ०४, क्षेत्र २४९.८५ चौ. मी. तळोजा जिल्हा रायगड,**

तरी याबाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किवा आर्थिक संस्थाचे किवा वर नमुद सदनिका संदर्भात, तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे. न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती, जसे विक्रि, बोजा, दान, गहान, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किवा इतर काही असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसाचे आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दिनांक : १५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभातसेंटर, सिबीडी बेलापुर**
**मो.नं ८३६९०१७३६३**

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे. क्रिएटिव्ह बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, त्यांच्या मालमत्तांमार्फत, पत्ता:– प्लॉट क्र. १४, सेक्टर ०४, तळोजा जिल्हा रायगड, हे खालील वर्णनाचा भुखंड मे. कियाना को–ऑप–हाऊसिंग सोसायटी (नियोजित) च्या नावे हस्तांतरित करत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**फाइल क्र. १२०८, उलवे, प्लॉट क्र. ११२, सेक्टर १९, क्षेत्र २९९.५० चौ. मी तळोजा, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड,**

तरी याबाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किवा आर्थिक संस्थाचे किवा वर नमुद सदनिका संदर्भात, तसेच कुल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे. न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती, जसे विक्रि, बोजा, दान, गहान, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किवा इतर काही असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसाचे आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दिनांक : १५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभातसेंटर, सिबीडी बेलापुर**
**मो.नं ८३६९०१७३६३**

# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील सुशोभीकरण कामांना वेग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची सेवा सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने विमानतळ परिसरातील रंगरंगोटी आणि रस्ते सुशोभीकरणाच्या कामांना वेग आला आहे.

विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील भिती, कम्पाउंड वॉल, फ्लायओव्हरखालील पॅनेल्स आणि रस्त्यालगतच्या संरचना नव्या डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची रंगसंगतीत नटविल्या जात आहेत. सिडकोने मुख्य कॉरिडॉरवर 'थीम–बेस्ड' भित्तिचित्रे, कलात्मक पेंटिंग आणि स्वच्छ, एकसंध लूक देणाऱ्या रंगकामाची निवड केली आहे. विमानतळाकडे जाणाऱ्या उलवेतील मुख्य मार्गावरील दुभाजक, पदपथ, दिशादर्शक फलक आणि पथदिव्यांच्या रंगरंगोटीची कामे पूर्ण झाली आहेत.

रस्त्याच्या रेखांकन पट्टांचे नूतनीकरणही केले जात आहे. फ्लायओव्हरचे खांब, बस टॅक्सी ड्रॉप पॉइंट परिसर आणि भुयारी मार्गांना एकसंध रंगछटा देऊन विमानतळ परिसराचे सौंदर्य वाढविले जात आहे. रात्रीच्या वेळी या कामांना अधिक गती देण्यात आली आहे. २५ डिसेंबरपूर्वी संपूर्ण परिसर स्वच्छ, आकर्षक आणि प्रवासी–अनुकूल दिसावा यासाठी अंतिम टचअपची कामे युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

# महिलेची आठ तोळ्यांचा हार चोरांनी केला लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महिलेच्या गळ्यातील आठ तोळे वजनाचा सोन्याचा हार आणि सोनसाखळी खेचून दोघेजण दुचाकीवरून पळून गेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुंदा गावंड( वय ४५) या करंजाडे, सेक्टर आर ५ येथे राहत असून, त्या लक्ष्मीनारायण मंदिरात लग्नाला जात होत्या. रात्री पावणेदहाच्या सुमारास वाघिवली वाडी येथून चालत जात होत्या. त्याचवेळी दुचाकीवरून दोघे आले आणि त्यांनी त्यांच्या गळ्यातील आठ तोळ्यांचा हार आणि सोनसाखळी जबरदस्तीने खेचली. या झटापटीत कुंदा जमिनीवर पडल्या.

## सार्वजनिक सूचना

तमाम जनतेस असे सांगण्यात येते कि माझे पक्षकार श्रीमती. शारदा ललित गोहिल हे आहेत याचे पती श्री. कै. ललित सोहनलाल गोहिल याच्या मालकीची असलेली सदनिका रो हाऊस ०४, प्लॉट नंबर–बी–५३, सेक्टर–१४, अमृत कॉ–ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड कळंबोली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड नवी मुंबई महाराष्ट्र पिन नंबर–४१०२१८, हि आहे श्री. के. ललित सोहनलाल गोहिल याच्या निधना नंतर वारस १) श्रीमती. शारदा ललित गोहिल २) श्री. भारत ललित गोहिल ३) कुमारी. भारती ललित गोहिल ४) कुमारी. कुसुम ललित गोहिल, ५) कुमार. नमन ललित गोहिल हे वारस पनवेल कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार वारस हे आहेत परंतु कुमार, नमन ललित गोहिल हा वयाने लहान असल्या कारणाने कोर्टामध्ये लीगल गार्डीयन शिफ साठी पनवेल कोर्टात अर्ज दाखल केलं आहे व हि जी मालमत्ता आहे ती मालमत्ता श्री. राजेश सोनलाल सिंग याना विकलेली आहे.,

या नोटीस द्वारे आपणास असे सागतोकी वरील मालमत्ता चे ओ. सी व सी.सी चे ओरिजनल पेपर हरवलेले आहे त्याची कळंबोली पोलीस स्टेशन मध्ये त्याची कंपलेट दाखल करत आहे जर हे पेपर ओरिजनल कोणाकडे असेल तर खालील ऑफिस च्या पत्यावर देण्यात यावे ऑफिस पत्ता के–२ इ–११, सेक्टर–५ई कळंबोली नवी मुंबई तालुका पनवेल, जिल्हा–रायगड नवी मुंबई हा आहे जर ७ दिवसाच्या आत मला आपले मत सांगण्यात यावे जर या मालमतेवर जर कोणाचे काही दावा असेल तर ते पण मला कळवण्यात यावे अन्यथा या प्रॉपर्टीचा टायटल साफ व क्लिअर आहे असे संबोधण्यात येईल.

दिनांक : १५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड.राकेश ब्रह्मदेव गायकवाड**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**मो.नं.९८१९०७७३८६**

## जाहिर नोटीस

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे आशिल श्री. राजिंदर कुमार बजाज पत्ता– सी. २५ रेल्वे सोसायटी, सेक्टर ०२, वाशी, नवी मुंबई ४००७०३.यांनी भूखंड मालक मेसर्स दलिचंद आणि कंपनी तर्फे भागिदार श्री. भूपेंद्र दलिचंद कोठारी आणि ईतर १ पत्ता– बी.५, जिनेश्वर दर्शन, नवरोजी लेन, कॉस्मोस बँक समोर, घाटकोपर (प) मुंबई ४०००८६. यांच्याकडुन खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा हक्क तबदील करून घेण्याचे करारामार्फत ठरवीलेले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटिस प्रसिध्द करीत आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे,

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | रोड नं. | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली वेअरहौसिंग प्लॉट | ०५ | KWC | ५६६ | ६००.०० चौ.मी. |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे आशीलांनी खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. व सदर वर नमूद भूखंड आमचे आशीलांचे नावे सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरवीलेले आहे

तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणा–या भुखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क – हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे आमचे आशीलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे**
**फ्लॅट नं.००३, शितल बिल्डींग, तळमजला, नवीन कोर्टासमोर, पनवेल, जि.रायगड–४१०२०६**

## जाहिर नोटीस

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे आशिल मेसर्स अंजनी स्टील कार्यालयीन पत्ता– प्लॉट नं. १६५३/१६५४, रोड नं. २१, सेक्टर KWC कळंबोली नवी मुंबई ४१०२१८. यांनी भूखंड मालक श्री. शांतिसरूप रेनिवाल पत्ता– १९१, पर्सिपोलिस अपार्टमेंट, १९ वा मजला, कफ् परेड, कोलाबा, मुंबई ४००००५. यांच्याकडुन खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा हक्क तबदील करून घेण्याचे करारामार्फत ठरवीलेले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटिस प्रसिध्द करीत आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे,

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | रोड नं. | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली वेअरहौसिंग प्लॉट | २६ | KWC | १९२९ | ९००.०० चौ.मी. |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे आशीलांनी खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. व सदर वर नमूद भूखंड आमचे आशीलांचे नावे सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरवीलेले आहे

तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणा–या भुखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क – हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे आमचे आशीलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/१२/२०२५

**सही/–**
**ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे**
**फ्लॅट नं.००३, शितल बिल्डींग, तळमजला, नवीन कोर्टासमोर, पनवेल, जि.रायगड–४१०२०६**

मा.पवार मॅडम कोर्ट

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चा.अर्ज क्र.१६९५/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०१/२०२६

१) श्री. संदिप मारुती पाटील,
वयः ४२, वर्षे, धंदाः नोकरी,
२) कु. वनिता मारुती पाटील,
वयः ४४ वर्षे, धदाः गृहीणी,
दोघेही रा. मु.नांदगाव गाव, वरची आळी.
दत्त मंदिर जवळ, पोस्ट : पळस्पे,
तालुकाः पनवेल, जिल्हाः रायगड, ४१०२०६ — अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, स्वर्गीयः जानकु उर्फ जानकुबाई मारुती पाटील (मयत) हयांने निधन दिनांकः ३०/०१/२०२५ रोजी मु. नांदगाव गावं, पो. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड येथे झाले आहे. येथे झाले आहे. सबब अर्जदार यांनी स्वर्गियः जानकु उर्फ जानकुबाई मारुती पाटील यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून मे. कोर्टात अर्ज केलेला आहे.

**मौजेः नांदगाव, तालुका पनवेल, जि. रायगड**

| अ.नं. | गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव | २४ | ०५/अ | ०–१५–७० | ३.५० |
| २ | नांदगाव | ४६ | ०९ | ०–१०–४० | ०.४१ |
| ३ | नांदगाव | ४० | ०९ | ०–२६–८० | ३.८१ |
| ४ | नांदगाव | ३० | १३ | ०–०५–६० | ०.८७ |

तरी अर्जदार यांच्या वारस हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर अर्जदार स्वर्गिय जानकु उर्फ जानकुबाई मारुती पाटील यांच्या वारस पत्रास हक्कदार असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१५/१२/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल समुद्रकिनारी वाळूवरती मंडप व स्टेज बांधून पर्यटकाचे लग्न

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल समुद्रकिनारी एका पर्यटकाने अत्यंत मोठा असा प्रताप केला आहे. पुण्याहून येऊन मंडपाचे सर्व साहित्य सोबत आणून कोंडविल समुद्रकिनारी असलेल्या सिल्वर सेंड हॉटेलच्या समोरच्या समुद्रकिनाऱ्यावर वाळूमध्ये मंडप व स्टेज उभारून आपल्या निकटवर्तीयाचे लग्न लावण्यात आले आहे. लग्नासाठी आलेल्या वधू-वरांची राहण्याची व्यवस्था समोरच असलेल्या हॉटेल सिल्वर सेंड या ठिकाणी करण्यात आल्याची खात्री पूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे समुद्रकिनारी लग्न विवाह सोहळा पार पडताना श्रीवर्धन तालुक्याच्या स्थानिक प्रशासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी सदर व्यक्तींनी घेतलेली नाही.

किंवा स्थानिक ग्राम पंचायत, स्थानिक तलाठी यांच्याकडून देखील कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नसल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. हिंदू धर्माच्या चालीरीतीप्रमाणे आपल्या घरातील मुलाबाळांचा विवाह पूर्वीच्या काळी घराच्या अंगणामध्ये लावला जात असे. सध्याच्या नवीन संस्कृतीनुसार हॉल घेऊन किंवा लॉन घेऊन विवाह पार पडला जातो. परंतु या ठिकाणी हा घडलेला प्रकार महाराष्ट्रात पहिलाच प्रकार असेल की समुद्रकिनाऱ्यावरील वाळूमध्ये मंडप व स्टेज उभारून लग्न लावण्यात आले.

समुद्रकिनाऱ्यावरील वाळूवरती भव्य दिव्य असे स्टेज व मंडप उभा करून लग्न लागत असताना श्रीवर्धन तालुक्यातील प्रशासनाला कानो कान खबर नव्हती. ही गोष्ट देखील अत्यंत महत्त्वाची आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील समुद्र किनारे हे अत्यंत संवेदनशील मानले जातात. १९९३ साठी मुंबई साखळी बॉम्बस्फोटात वापरण्यात आलेले आरडीएक्स हे घातक स्फोटक सदर लग्न मंडपाच्या ठिकाणापासून केवळ दोन किलोमीटर अंतरावरती उतरविण्यात आले होते. त्यावेळी लहान मोठ्या प्रमाणात श्रीवर्धन परिसरात



स्मगलिंग चालत असे. परंतु या स्मगलिंग बाबत स्थानिकांना फारशी माहिती नसल्यामुळे त्याचाच फायदा बॉम्बस्फोट घडविणाऱ्यानी मुंबईसारख्या एका महानगरामध्ये, देशाच्या आर्थिक राजधानी मध्ये देशविरोधी कृत्य करून बॉम्बस्फोट घडविण्यात आले.

यामध्ये श्रीवर्धन तालुक्याचे नाव देखील मोठ्या प्रमाणावर बदनाम झाले मात्र आता लग्न समारंभा सारखा सोहळा देखील पैसे वाचवण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावरती मंडप बांधून करण्यात येत असेल. तर या ठिकाणी राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना समुद्र मोकळाच आहे. असेच म्हणावे लागेल. सदरचा लग्न समारंभ पार पाडण्यासाठी त्या ठिकाणची जागा कोणी उपलब्ध करून दिली? कोणी सदर लग्न समारंभासाठी परवानगी दिली? याबाबत स्थानिक प्रशासनाने चौकशी करणे अत्यंत आवश्यक आहे. दिवसेंदिवस पुणे सारख्या शहरातून येणाऱ्या पर्यटकांमुळे या ठिकाणचे पर्यटन वाढत असले तरी गैरप्रकारात देखील मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

तरी श्रीवर्धन चे तहसीलदार, श्रीवर्धन चे गटविकास अधिकारी, श्रीवर्धन चे पोलीस निरीक्षक,श्रीवर्धनच्या उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी या प्रकरणी चौकशी करून संबंधित लग्न समारंभ पार पाडणारे व लग्न समारंभ पार पाडण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या हॉटेल मालकाला देखील जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करावी. अशी मागणी केली जात आहे.

# चार लाख रुपये खेचून चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

६५ वर्षीय जेष्ठ नागरिकाच्या बॅगेतील चार लाख रुपये रोख रक्कम जबरदस्तीने खेचून दोघेजण मोटरसायकल वरून पसार झाले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात ११ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

सुबोध चंद्र मायाराम कलीता हे खारघर, सेक्टर २० येथे राहत असून ते ११ डिसेंबर रोजी प्लास्टिक बॅग मध्ये चार लाख रुपये फंडाची रक्कम काढून घराकडे पायी जात होते. सेक्टर १९ बँकेसमोरून जात असताना रस्ता क्रॉस करत होते.

सेंट्रल पार्क कडे जाणाऱ्या रस्त्यावर पाठीमागून आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातील पैशांची पिशवी खेचून ते पळून गेले.

---

मे.गणवीर मॅडम कोर्ट

अॅड.सौ.रश्मी बळीराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे समोर

दि.चौ.अर्ज क्र.१६५५/२०२५

नि.नं.८

ने.ता.१५/०१/२०२६

१) श्रीमती.रंजना सुरेश देवपूरकर
वय : ६८ वर्षे, व्यवसाय : काही नाही
२) श्री.अजय सुरेश देवपूरकर
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रहिवासी : फ्लॅट क्रमांक १०२, बोंझर रेसिडेन्सी,
प्लॉट क्रं.५, सेक्टर ३४ अ, ओवेगाव खारघर, जि.रायगड
३) विनिता सुरेश देवपूरकर
वय : ४० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रहिवासी : फ्लॅट क्रमांक ३, शिवाजी एन्क्लेव्ह
४३, नेताजी रोड, फ्रेंझर टाऊन, बंगळुरु — अर्जदार

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत श्री.सुरेश मनोहर देवपूरकर यांचा मृत्यू दि.०२/०६/२०२२ रोजी बीएआरसी हॉस्पिटल, मुंबई येथे निधन झाले आहे आणि अर्जदार वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ ही मुले आहेत.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name of the Property Holder: Late Suresh Manohar Devpurkar 50% share Flat no 102, Bonzer Residency, Plot no 5, Sector-34A, Owe gaon Kharghar, Dist-Raigad. Admeasuring area 61.372 Sq.mt. (Built-up) Agreement Value Rs. 45,00,000/- (Rupees Forty five lakhs Only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्यात. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

दि.१५/१२ सन २०२५ बेलिफाकडे

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहिर नोटीस

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे आशिल श्री. ईस्माईल ईस्लाम अहमद खान पत्ता- फ्लॅट नं. १०२, अमित को.ऑप.हौ.सो. प्लॉट नं. ०९, सेक्टर ८ ई, कळंबोली, नवी मुंबई, ४१०२१८.यांनी भूखंड मालक मेसर्स श्री. साई ईंटरप्रायझेस,तर्फे भागिदार श्री. प्रदीप एम. सुरेखा आणि ईतर १. पत्ता- सी. ५५/५६, हायवे अपार्टमेंटस, सायन (पू), मुंबई ४०००२२. यांच्याकडुन खालील वर्णनाच्या भुखंडाचे भाडेपट्टा हक्क तबदील करून घेण्याचे करारामार्फत ठरवीलेले आहे. तरी सदर भुखंड मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटिस प्रसिध्द करीत आहे. सदर भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे,

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे | रोड नं. | सेक्टर नं. | भूखंड नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| कळंबोली वेअरहौसिंग प्लॉट | ०६ | KWC | ६९२ | १२५.०० चौ.मी. |

सदर वर नमूद भूखंडातील हक्क हे आमचे आशीलांनी खरेदी करण्याचे ठरवीलेले आहे. व सदर वर नमूद भूखंड आमचे आशीलांचे नावे सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतर करून घेण्याचे ठरवीलेले आहे

तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणा-या भुखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कैंजा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे आमचे आशीलांचे नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : १५/१२/२०२५

सही/-

**अॅड.विजयेंद्र नारायण मुंढे**
**फ्लॅट नं.००३, शितल बिल्डींग, तळमजला, नवीन कोर्टासमोर, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

---

अर्जदारतर्फे वकील अॅड.कुंडलिक का. मोहिते

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे. मोटार अपघात न्याया.सो. रायगड यांचे कोर्टात

मो. अप. क्लेम. नं. ४८/२०२३

नि.नं.३२/ड

सौ. मनीषा सुशिल डेरे — अर्जदार

विरुद्ध

बजाज अलियान्झ जनरल इन्श्युरन्स कं. लि. — सामनेवाला

सामनेवाला नं. १
१) श्री. प्रशांत प्रकाश पाटील
सृष्टि बंगला, मलंग निर्माण, पनवेल,
रायगड, महाराष्ट्र ४१०२०६

दिनांक १४/०४/२०२२ रोजी सकाळी ९:४५ वाजण्याच्या सुमारास दि. बा. पाटील नगर चौक पनवेल येथे तुमचे मालकीचा डंपर नं. MH-46-AR-7894 हा स्वामी नारायण मंदिर रोडवर चालवित असताना चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अविचाराने, हयगयीने, बेदकारपणे व अतिवेगाने गाडी चालवून अपघात केला. सदर अपघातामध्ये सौ. मनीषा सुशिल डेरे या जखमी झाल्या. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुध्द अपघात नुकसान भरपाई मिळणेकरीता रु. १,००,०००/- व जस्ट कॅम्पेशन चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हांस जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दिनांक २४/१२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयांत सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुध्द पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज तारीख १०/१२/२०२५ रोजी माझ्या सहिनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक जिल्हा न्याया. अलिबाग** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- अधिक्षक (न्याय विभाग) जिल्हा न्याया. अलिबाग**

---

## जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते कि, आमचे अशिल मे. रॉयल ग्रुप, त्यांच्या भागीदारांमार्फत १) श्री. सोहेल मोहम्मद नूर नमरे २) श्री. शेख इम्रान शेख इक्बाल, पत्ता: प्लॉट तळोजा, प्लॉट क्र. ६०, सेक्टर २६, क्षेत्र तळोजा जिल्हा रायगड, हे खालील वर्णनाचा भुखंड मे. रॉयल प्लाझा को-ऑप-हाऊसिंग सोसायटी (नियोजित) च्या नावे हस्तांतरित करत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**संचिका क्र. ८८५/ए, तळोजा, प्लॉट क्र. ६०, सेक्टर २६, क्षेत्र ३९९.४५ चौ. मी.. तळोजा जिल्हा रायगड,**

तरी याबाबत कोणाही व्यक्ती/व्यक्तीचे किवा आर्थिक संस्थाचे किवा वर नमुद सदनिका संदर्भात, तसेच कुल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे. न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती, जसे विक्रि, बोजा, दान, गहान, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किवा इतर काही असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झालेपासुन १४ दिवसाचे आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दिनांक : १५/१२/२०२५

सही/-

**अॅड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं. १३, प्रभातसेंटर, सिबीडी बेलापुर**
**मो.नं ८३६९०१७३६३**

---

## जाहीर नोटीसीस हरकत

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, दिनांक ११/१२/२०२५ रोजीच्या दैनिक किल्ले रायगड या वर्तमानपत्रातील पान क्र.२ वर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरची जाहीर नोटीस ही अॅड. अनिल एस. जाधव, पत्ता: गाळा नं. १०, धीरा दर्शन रेसिडन्सी, प्लॉट नं. १२, सेक्टर-१०ई, हनुमान मंदिरा जवळ, रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई - ४१०२०८ (मो.नं. ९८२१०६२०११ / ७९७७५६९२९३) यांच्या वतीने देण्यात आलेली आहे.

सदरील जमीनीचा मुळ गट खालील वर्णन केल्याप्रमाणे होता व आहे.

**मौजे देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे/गट नं. /हिस्सा नं. | क्षेत्र हेक्टर-आर-पै | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| देहरंग, ता.पनवेल | १ ल/१ पोटखराबा | १९-५९-० ०२-४८-४ | ४६-९९ |

सदरची जमिन ''कुळ'' म्हणून जवळपास ९० ते ९५ वर्षांपासुन आमचे अशिलाचे आजोबा मयत गोमा बाळु वाक / वाघ हे स्वतः कसत होते व त्यांचेच कब्जेउपभोगात होती व त्यानंतर त्यांचे वारसांच्या कब्जेउपभोगात आहे. तथापि, जमिनीचे मुळ मालक यांनी दिनांक ०५/१२/२०२५ रोजी अनधिकृतरीत्या अतिक्रमण करुन, सदरील शेतजमिनीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न केला होता व आहे. त्याकरीता जेसीबी मशिनरीचा उपयोग देखील केलेला आहे. तरी त्यांचे विरुदध फौजदारी दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसे तक्रारी अर्जाने पोलिसांना तसेच इतर अधिकाऱ्यांना कळविले आहे.

सदर जमिन मिळकतीमध्ये बेकायदेशीर गटफोड झाल्यानंतर गट क्र.१ल/१ई असा करण्यात आलेला आहे. त्याबाबत कुळांना कोणतीही कल्पना न देता मुळ मालकांनी पूर्णपणे खोटे, चुकीचे, बेकायदेशीरकरत्या व लबाडीने करुन घेतलेले आहे.

सदरबाबत दिनांक २४/०७/२०१४ रोजी फौजदारी किरकोळ अर्ज नं. १०३७/२०१४ श्री. किशोर गजानन पाटील व अन्य १८ इसमांविरुदध व संबधित महसुल खात्याचे अधिकारी १. तलाठी, २. मंडळ अधिकारी, ३. तहसिलदार साहेब, पनवेल व इतर यांचेविरुद्ध दाखल केलेला होता व त्याचे कामकाज चालु आहे. मे. न्यायालयाने त्यावर तारीख ०१/०२/२०२५ रोजी नवीन कायदयाचे बीएनएसएस कलम २२५, जुना कायदा सीआरपीसी कलम २०२ प्रमाणे चौकशी करण्याचे आदेश दिलेले असून पनवेल शहर पोलीस स्टेशन यांचेकडुन अहवाल मागविण्याचा हुकूम देखील केलेला आहे. याची दखल घ्यावी.

दिनांक ११/१२/२०२५ रोजी दैनिक किल्ले रायगड मधील जाहीर नोटीसीनुसार प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत वरील मिळकतीसंदर्भात हरकती वकीलांनी मागितलेली आहे.

सदरील जाहीर नोटीसीस अनुसरुन तमाम जनतेस, संस्थेस व अन्य इतर यांना व विशेषतः अॅड. अनिल जाधव व त्यांचे अशिल यांना कळविण्यात येते की, वरील शेतजमिन मिळकत श्री. सुभाष हशा वाक / वाघ तसेच अन्य इतर वारस यांचे कब्जेवहीवाटीत व सामाईकरित्या उपभोगात आहेत म्हणजेच एकुण क्षेत्र १९-५९-० व पो.ख. ०२-४८-४ असे पूर्ण क्षेत्र आमचे अशिलाच्या कब्जेवहिवाटीत व उपभोगात आहे. आमचे अशिल हे आदिवासी असून ते कुळ म्हणुन तिथे जमिनीची मशागत करत असुन त्यांचे कब्जेउपभोगात आहे. सबब, वरील सर्व इसमांचा या शेतजमिन मिळकतीमध्ये त्यांना सर्व प्रकारचे हक्क, अधिकार व हितसंबंध प्राप्त झालेले आहे. त्यामुळे वरील शेतजमिन मिळकत ही कोणीही कोणासही विकण्याचा अथवा कोणत्याही स्वरुपाचा करार करुन देण्याचा हक्क, अधिकार, हितसंबंध नाही. तसेच सदरील शेतजमिनीबाबत मे. पनवेल येथील न्यायालयात चार दिवाणी दावे आर. सी.एस. नं.७९/२०१५, ८०/२०१५, ८१/२०१५, ८२/२०१५ तसेच एक फौजदारी तक्रार नं.१०३७/२०१४ असे प्रलंबीत आहे. सदरील फौजदारी तक्रारीमध्ये मे. न्यायालयाने त्यातील आरोपींनी खोटे बनावट दस्तऐवज करुन दिशाभूल करुन खोटे फेरफार करुन घेतेलेले असल्याने फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ अन्वये पुढील तपासासाठी आदेश पारीत केलेले आहेत.

सबब, अशा परिस्थितीत वरील शेतजमिनीचे संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करण्यात येवू नये. ही हरकत लक्षात घेता कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार हा आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याउपरही जर कोणी कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार वरील शेतजमिनीच्या संदर्भात केल्यास त्याचे खर्चास व परिणामांस तुम्ही सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

सदरील हरकतीची प्रत ही दैनिक किल्ले रायगड, दैनिक रायगड नगरी या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच स्पीड पोष्टाने सदरील हरकत अॅड. अनिल जाधव व संबंधीत तलाठी मौजे देहरंग, मंडळ अधिकारी व म. तहसिलदार, पनवेल यांचेकडे महसुल खात्याच्या दप्तरी कोणत्याही स्वरुपाची नोंद करण्यात येवू नये म्हणून सादर केलेली आहे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीसीस हरकत घेतली असे.

दि.१५/१२/२०२५

सही/-

**अॅड.विनोद एस. येवले**
**१२, प्रभात सेंटर (अॅनेक्स), सेक्टर-१ए, सी.बी.डी.-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो. नं.९३२००२१६०४**

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे पेण ग्रामीण, ता-पेण, जि-रायगड, येथील खालील वर्णाणाच्या मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यामध्ये एकूण क्षेत्रापैकी १८७ चौ. मी. इतके क्षेत्रास १) श्री. दिलीप वाळचंद भाटी, २) श्री. भावेश धिसुलाल परमार, यांचे नाव नमुद असून सदरची मिळकत त्यांच्या मालकी हक्काने व ताबेकब्जाने असल्यामुळे सदरहू मिळकत ही आमचे आशिल श्री. नरेश हरिश्चंद्र कोठेकर, व संतोष हरिश्चंद्र कोठेकर, रा.गडब, ता. पेण, जि. रायगड, यांनी विकत घेण्याची ठरविलेली आहे, तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता आमचे आषिलांच्या वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पेण ग्रामीण, ता.पेण, जि.रायगड**
**श्री समर्थ कृपा सह. गृहनिर्माण संस्था मर्या.**

| मौजे | गटविभाग/ उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| पेण ग्रामीण | ३८४/४/अ/३ | बिन शेती सामाईक क्षेत्र ३-४२-०० या मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी विक्रीचे क्षेत्र १८७ चौ. मी. | २१८.८८ |

प्राप्त परिस्थीतीत वरील परिशिष्टामध्ये नमुद केलेली सदर मिळकतीमध्ये कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु, वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबधितानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपला हक्क व हितसंबधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी, कळवावे, अगर समक्ष येवून भेटावे, वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तधर, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहित असून, त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबध नाही, असे समजण्यात येईल, त्यानंतर आलेल्या तधरी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत असे गृहित धरण्यात येईल, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पेण

दिनांक : १६/१२/२०२५

सही/-

**रसिक विश्वनाथ कोठेकर**
**वकील**
**शशिविश्व बंगलो, म्हाडा वसाहत, प्लॉट नं.८, ता. पेण, जि. रायगड.**
**मोबा. नं. ९५६१९१९१११**

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : विंधणे, ग्रामपंचायत : विंधणे, सजा : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या जमिनीचे सर्व मालकी हक्क माझे अशिल यांनी जमीन मिळकतीच्या मालकाकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर वर्णन व विद्यमान कब्जेदारांची नावे खालील प्रमाणे :-

**वर्णन**
**मौजे : विंधणे, तलाठी : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| भोगवटादारांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.वसंत महादेव घरत UP-ID : 19800226607 | १) २९८ | ४ एकूण पैकी | ०-३७-०० ०-००-०० ०-३७-०० ०-२०-०० | ३.६३ |
| UP-ID : 35890785425 | २) २६० | २ एकूण पैकी | ०-३०-७० ०-०५-१० ०-३५-८० ०-१९-०० | २.८७ |

वरील मिळकत ही एकूण ०-३७-० क्षेत्रापैकी भोगवटादार २० गुंठे आणि ०-३५-८० क्षेत्रापैकी १९ गुंठे श्री.वसंत महादेव घरत यांच्या नावे आणि मालकीची असलेली सातबारा उताऱ्यावर नमूद असलेली जमीन मालकीची असलेली परवानगी मिळवून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणचाही गहाण, दान, बोजा, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, टस्टी, पोटगी, वारसा, भाडेपटटा, वहीवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात दिवसांच्या) आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकतीसंदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

पनवेल/उरण

दिनांक : १६/१२/२०२५

सही/-

**श्री.प्रसाद एन. पाटील**
**अॅडव्होकेट**
**ए विंग, ४०३, तुलसी सोनेटा, चॅनल उपवन जवळ, साईनगर (प.), ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९७०२०८२६६९**

---

मा.राठोड मॅडम कोर्ट

अर्जदारांचे वकील
श्री.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.५ वे सहदिवाणी न्यायाधिश करिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५९७/२०२५

नि.नं.७/ड

ने.ता.१७/०१/२०२६

१)श्री. चिंतामण रघुनाथ गोंधळी वय : ४९ वर्षे,
रा. जावळे, पो. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड.
२) सौ. कल्पना हरिश्चंद्र पाटील वय ५४ वर्षे,
रा. घर नं.६११, लक्ष्मण पाटील मार्ग,
सेक्टर क्र. ५, सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
३) सौ. मंदाकिनी विश्वास पाटील वय ४८ वर्षे,
रा. बेलपाडा, पो. जासई, ता. पनवेल, जि. रायगड.
४) सौ. सुनिता जयशंकर पाटील वय ४३ वर्षे,
रा. वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. शांताबाई रघुनाथ गोंधळी या दि.१७.०८.२०२५ रोजी मौजे वहाळ, ता. पनवेल, जि. रायगड येथे मृत्यु पावल्या असून, त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| वहाळ-४२ | ४०१ | ० | ०-६८-० |
| | ४०२ | २ | ०-२३-० |
| वहाळ-१० | ३८९ | १ | १-४३-० |
| | ३८९ | ४ | ०-१४-० |
| | ३९३ | १ | ०-३१-९ |

वरील वर्णन केलेल्या संपादित मिळकतींचे नुकसान भरपाई म्हणून खालील वर्णनाचे भुखंड वाटप करण्यात आले आहेत.

**भुखंडाचे वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर-दापोली | ४५ | १० | २९८० |
| पुष्पक नोड-उलवे | १३४ | २६ | १४४० |

अर्जदार हे कै. शांताबाई रघुनाथ गोंधळी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तिस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहीत मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना. कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाया हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि. ११/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# उरण पूर्व विभागाला जोडणाऱ्या गव्हाणफाटा येथील रेल्वे पुलाचे काम धिम्या गतीने



**दै.रायगड नगरी । उरण**

पूर्व विभागाला जोडणाऱ्या गव्हाणफाटा – चिरनेर दरम्यानच्या मालगाडी रेल्वे मार्गावरील ओव्हर-हेड जुन्या पुलाच्या दुरुस्तीचे काम मागील तीन वर्षभरापासून रखडले आहे.त्यामुळे या दररोज प्रवास करणाऱ्या पाच हजार प्रवासी वाहनांना दोन किमी अंतरापर्यंत वळसा घालून चिर्ले मार्गाने प्रवास करावा लागत आहे. तसेच अनेक वाहने जेएनपीए ते पळस्पे राष्ट्रीय महामार्गावरून विरुद्ध दिशेने धोकादायक प्रवास करीत आहेत.यामुळे मोठ्या प्रमाणावर गैरसोय होऊ लागल्याने प्रवासी आणि वाहन चालकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.

जेएनपीए बंदरातुन देशभरात कंटेनर मालाची वाहतूक करणाऱ्या रेल्वे मार्गावरील धोकादायक ओव्हरहेड पुल पाडण्यात आला आहे.पाडण्यात आलेल्या या ओव्हरहेड पुलाच्या दुरुस्तीचे काम मागील तीन वर्षांपासून रखडत रखडत सुरू आहे. पनवेल , मुंबई,नवी मुंबई व ठाण्यासह इतर मार्गाकडे जाणारा व उरण पूर्व विभागाशी जोडणारा गव्हाणफाटा – चिरनेर रस्त्यावरुन दररोज पाच हजारांहून अधिक वाहने आणि प्रवासी प्रवास करीत होते.मात्र मध्य रेल्वेच्या कंटेनर मालाची वाहतूक करणारा ओव्हरहेड जुना पुल वाहतूकीसाठी धोकादायक बनला होता. त्यामुळे जुना ओव्हरहेड पुल बंद करून व तोडून त्याची दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

या नव्याने ओव्हरहेड पुलाच्या बांधकामासाठी या मार्गावरुन येजा करणाऱ्या वाहनचालकांची व प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.परंतु पर्यायी रस्ता वाहनांना गव्हाणफाटा सर्कल वरून सुमारे दिड किलोमीटरचा वळसा घालून चिर्लेमार्गावरुन प्रवास करावा लागत आहे.तर चिरनेर मार्गांवरून येणाऱ्या वाहनांना पनवेलकडून येणाऱ्या महामार्गाच्या उलट्या धोकादायक मार्गातून वळसा घेऊन गव्हाणफाटा मार्ग गाठावा लागत आहे. गव्हाणफाटा – चिरनेर मार्गांवरील रेल्वे पुलाच्या अडथळ्यामुळे उरण तालुक्यातील जांभूळपाडा, वेश्वी,दिघोडे या गावाची एसटी बससेवा बंद झाली आहे.

तसेच या मार्गांवर अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच हा पर्यायी रस्ता प्रवासी रिक्षा, मॅजिक रिक्षा आणि अन्य वाहनांसाठी धोकादायक ठरू लागलेला आहे.सर्वांसाठी खार्चिक ठरलेला पर्यायी रस्ता बाजारहाट व अन्य कामांसाठी पनवेल, नवीमुंबई मार्गाकडे जाण्यासाठीही गैरसोयीचा ठरु लागला आहे. त्यामुळे या मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम मध्य रेल्वे प्रशासन पुर्ण करण्याची अपेक्षा नागरिकांना होती.

मात्र मागील तीन वर्षभरापासून सुरू करण्यात आलेल्या मालवाहू रेल्वे मार्गावरील ओव्हरहेड पुलाचे काम रखडत रखडत सुरू असल्याने प्रवासी व वाहनचालकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होऊ लागली आहे.

यामुळे प्रवासी आणि वाहन चालकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत संबंधित विभागाकडून विचारुन माहिती देतो. अशी प्रतिक्रिया मध्यरेल्वे प्रशासनाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

# तळा पंचायत समितीला गटशिक्षण अधिकारी कधी मिळणार ?

**दै.रायगड नगरी । तळा**

दुर्गम व डोंगरी तालुका म्हणून ओळखला जाणाऱ्या तळा तालुक्याला तब्बल १९ वर्षे अधिकृत गटशिक्षण अधिकारी न आल्याने शिक्षण विभागाची धुरा प्रभारी विस्तार अधिकारी यांना पहावी लागत आहे. यामुळे शैक्षणिक अनेक अडचणी निर्माण होत असल्याने तालुक्याला अधिकृत गटशिक्षण अधिकारी कधी मिळेल? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

२००४ मध्ये अधिकृत अधिकारी श्री.झणझणे यांची बदली झाल्यानंतर हा पदभार अनेक वर्षे विस्तार अधिकारी सुरेखा तांबट यांनी स्वीकारला. त्यांची दोन वर्षांपूर्वी माणगाव येथे बदली झाल्यानंतर आता हा पदभार पुन्हा त्याच पाहत आहेत.माणगाव तालुक्यात खूप कामे असल्याने त्यांना तळा तालुक्यासाठी वेळच मिळत नाही महिना महिनाभर त्यांना तळा तालुक्याला भेट देण्यास वेळ मिळत नाही त्यामुळे तालुक्यातील अनेक कामे प्रलंबित आहेत प्रभारी विस्तार अधिकारी असल्याने काही निर्णय घेण्यात त्यांनाही वाट पहावी लागत आहे प्रत्येक ठिकाणी प्रभारी अधिकारी महत्त्वाच्या पदावर असल्याने ज्या त्या विभागाच्या कामकाजावर परिणाम झाला आहे. फायलींचा निपटारा, महत्त्वाच्या निर्णयांना विलंब लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

तळा पंचायत समितीमध्ये गटशिक्षणाधिकारी, दोन विस्तार अधिकारी, सहा केंद्रप्रमुख, पोषण आहार अधीक्षक ही सर्व पदे प्रभारी आहेत फक्त एकमेव केंद्रप्रमुख पूर्ण वेळ कार्यान्वित आहे. तालुक्यात नवीन शिक्षकांची भरती होऊन अनेक शिक्षक तळा तालुक्यामध्ये रुजू झाले आहेत मात्र दुर्गम डोंगराळ भागातील सदर शिक्षक हे आठवड्यातून एक दोन दिवस अनियमित रजेवर असल्याचे दिसून येते आहे मोबाईल टीचर यांना शासनाने सेवेत कायम करण्याचा निर्णय घेऊन त्यांना आदेश पारित केले असल्याचे समजते सदर मंडळी विद्यार्थ्यांना किती वेळ देतात कोणता अभ्यासक्रम शिकवतात, त्याचा किती उपयोग झाला ? हे ही लक्षात घेणे गरजेचे आहे पंचायत समिती पातळीवर वेगवेगळ्या विषयांसाठी साधन व्यक्ती अनेक वर्ष काम करीत आहेत त्यांना सुद्धा अध्यापनाचे काम दिल्यास काही शाळांचा कामाचा तणाव कमी होईल पंचायत समितीला संगणक तज्ञ यांची नेमणूक झाली आहे सदर संगणक तज्ञ कोणकोणत्या शाळेत जाऊन संगणकाचे मार्गदर्शन करतात हे विचारात घेतले पाहिजे या सर्वांचा सरासर विचार केला तर सहनियंत्रण करण्यासाठी पूर्ण वेळ गटशिक्षणाधिकारी असणे गरजेचे आहे.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा दर्जा आणि शैक्षणिक गुणवत्ता यासंबंधी उठसूठ चर्चा होत असताना या खात्याचा कारभार हाकणारे अधिकारीच तालुक्यात नाहीत. गटशिक्षणाधिकारी या महत्त्वाच्या पदांचा कार्यभार प्रभारी अधिकाऱ्यांकडे आहे. गेली १९ वर्षे पूर्ण वेळ प्रशासनाधिकारी नाही. हे पद जबाबदारीचे असतानाही पात्र अधिकारी नियुक्त करता आलेला नाही, जिल्हा परिषद प्रशासन एकीकडे 'समृद्ध शाळा'अभियान राबवित आहे, तर दुसरीकडे तालुका पातळीवर जबाबदार अधिकारी नाहीत. विस्तार अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवली आहे.राज्याच्या महिला बालकल्याण मंत्री यांच्या मतदार संघात गेली १९ वर्षे विस्तार अधिकाऱ्याकडे येथील चार्ज देण्यात आला असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# शिस्त आणि सर्वांगीण शैक्षणिक सुविधा यामुळे शाळेचा आलेख वाढतोय : दिपीका पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

शाळांमध्ये असणारी शिस्त आणि सर्वांगीण शैक्षणिक सुविधा यांमुळे सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजच्या शाळांचा विद्यार्थ्यांचा तसेच गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस वाढत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शिक्षण संस्था सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजच्या उपाध्यक्षा दिपीका पाटील यांनी पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष ड पी डी पाटील, चिटणीस राजेश पाटील, सदस्य नरेंद्र पाटील, आप्पा धनावडे, धीरज पाटील, सतिश तेलंगे, प्राचार्य एस एच नाईक, उपमुख्याध्यापक आर आर पाटील, पर्यवेक्षक एस एस मोरे,कार्याध्यक्षा एन एम घाडगे, शिक्षक प्रतिनिधी पी पी पाटील, शिक्षिका प्रतिनिधी ए डी कोळी, डी के पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी आदर्श मोकल, नव्या पाटील, तन्वी म्हात्रे, प्रेम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे अध्यक्ष ड पी डी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी रांगोळी आणि चित्रकला प्रदर्शन हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या उपाध्यक्षा दिपीका पाटील यांनी आपल्या संस्थेच्या शाळेतील शिस्त तसेच विविध कलागुणांना दिला जाणारा वाव या सर्व गोष्टींमुळे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि विविध स्तरातील आलेख वर्षानुवर्ष वाढतच असल्याचे सांगून हा आलेख असाच वाढता ठेवा आम्ही तुमच्यासाठी असेच विविधांगी उपक्रम तुमच्या उज्वल भवितव्यासाठी राबवत राहू असे सांगितले.

तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्राचार्य एस एच नाईक यांनी आजचा हा कार्यक्रम म्हणजे नुसता कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्वाचे व्यासपीठ असून वर्षभरातील त्यांच्या सप्तगुणांचा सोहळा आहे. या संस्थेमध्ये शिस्त आणि शैक्षणिक व भौतिक सोयी यांसाठी आमचे सर्व शिक्षक अहोरात्र प्रयत्न करत आहेत आणि त्याला संस्थेचे अध्यक्ष व पूर्ण समिती यांची मोलाची साथ असते असे सांगितले. यावेळी रांगोळी आणि चित्रकला प्रदर्शनातून चालू घडामोडी तसेच महिला सुरक्षा, प्लास्टिक बंदी जनजागृती, विविध महापुरुष, विविधतेत एकता, धार्मिक संस्कृती, पर्यावरण आदी गोष्टींचा समावेश करण्यात आला होता.या कार्यक्रमादरम्यान विविध शिक्षकांना वेगवेगळ्या क्षेत्रातील आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते ज्ञानप्रभा स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली वसाहती मधील अनेक तरुणांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे. शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊन,शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेना उत्तर भारतीय सेल पनवेल तालुका प्रमुख चंद्र प्रताप प्रजापती (सी. पी.) यांच्या प्रयत्नाने विकास शर्मा, अभिनेता सिंह, रंजीत सिंह, गोवर्धन प्रचारपाते, राजनाथ पासवान, आशिष राजपुत्र, अभिषेक राजपुत, विरेन्द्र साह, आकाश सिंह, बाबू चौहान, विन्दु प्रजापति, प्रयोग शाह, अरविन्द पॉल, सत्यनारायण शर्मा यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

# शेअर मार्केट मध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून २१ लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुंतवणूक केलेल्या रकमेवर कोणताही नफा आणि गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सहा अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुजवा चक्रवर्ती हे कळंबोली, सेक्टर १६ येथे राहत असून ते फिल्म इंडस्ट्रीमध्ये पोस्ट प्रोडक्शन मार्केटिंग करतात. त्यांना शेअर मार्केट ट्रेडिंग संदर्भात जाहिरात दिसली. त्या लिंकवर क्लिक केले असता त्यांना व्हॉट्सॲप ग्रुपवर ॲड करण्यात आले. ट्रेडिंग करायचा असल्यास ॲपवर पैसे टाकावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैसे गुंतवले आणि ट्रेडिंग सुरू केली. त्यांना १० हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्यांनी २५ हजार रुपये पाठवले आणि त्यांना एक लाख रुपये नफा मिळाला. चांगला परतावा मिळत असल्याने ठेवला विश्वास पैसे अकाउंटवर येतात का हे पाहण्यासाठी त्यांनी बँक खात्यावर रक्कम ट्रान्सफर केली. ते त्यांच्या बँक खात्यावर दिसले. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला आणि त्यांनी आणखी पैसे ट्रान्सफर केले. त्यांना लाखांचा नफा दिसत होता. त्यांनी एकूण २१ लाख ७४ हजार रुपये जमा केले असता ॲपवर एक कोटी रुपये दिसून आले. त्यानंतर त्यांनी पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते ट्रान्सफर झाले नाहीत. त्यावेळी तुम्हाला १० लाख रुपये ३ कमिशन भरावे लागेल, त्यानंतर ते पैसे खात्यावर जमा होतील असे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तळोजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रीनुसार गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

# स्कुटी ढकलताना अज्ञात वाहनाच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेट्रोल भरण्यास स्कुटी ढकलत घेऊन जात असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत पंधरा वर्षीय साक्षी अरुण पाटील (राहणार पाटनोली) या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला तर कृतिका दिनकर भगत (वय १५) ही विद्यार्थ्यांनी जखमी झाली. या अपघाताप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १३ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

१३ डिसेंबर रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास साक्षी पाटील ही एक्टिवा स्कुटी क्रमांक एम एच ४६ सीडी ०९८० ही पेट्रोल भरण्यास ढकलत घेऊन जात असताना जेएनपीटीवरून पळस्पेकडे येणाऱ्या सर्विस रोडवर पंकज पार्किंगच्या जवळ ब्रिजच्या खाली कुंडेवहाळ येथे अज्ञात वाहनावरील चालकाने साक्षी पाटील आणि तिच्यासोबत असलेली मैत्रीण कृतीका भगत या दोघी ढकलत असलेल्या ॲक्टिवा स्कुटीला धडक दिली.

या धडकेत साक्षी अरुण पाटील हिचा मृत्यू झाला तर कृतिका दिनकर भगत ही जखमी झाली. त्यानंतर अज्ञात वाहन चालक जखमींना मदत न करता पळून गेला. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत

# इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे 'ऑरेंज द वर्ल्ड' मोहिमेअंतर्गत जनजागृती उपक्रमांचे आयोजन




**दै.रायगड नगरी । पनवेल**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुरस्कृत 'ऑरेंज द वर्ल्ड' या आंतरराष्ट्रीय मोहिमेअंतर्गत इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने नवीन पनवेल येथील सी. के. टी. विद्यालयात इयत्ता ९वी व ११वीच्या विद्यार्थिनींसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालय प्रशासनातर्फे इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी 'ऑरेंज द वर्ल्ड' मोहिमेचे महत्त्व, महिलांचे हक्क, सुरक्षितता तसेच महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका याविषयी विद्यार्थिनींना सविस्तर व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थिनींसाठी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम आणि ज्युनिअर कॉलेज अशा तीन विभागांतून प्रत्येकी तीन विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. उत्कृष्ट पोस्टर सादर करणाऱ्या विद्यार्थिनींना इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी स्त्रियांवरील हिंसाचार थांबवा या संदेशासाठी विद्यार्थिनी, शिक्षिका तसेच इनरव्हील क्लबच्या सदस्यांनी ऑरेंज रंगाच्या फिती परिधान करून, हातात जनजागृतीपर पोस्टर्स घेत विद्यालयाबाहेरील परिसरात जनजागृती फेरी काढली. या फेरीद्वारे महिलांवरील हिंसाचाराविरोधात समाजात सकारात्मक संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालिका वर्षा ठाकूर, इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा शुभांगी पिंपळकर, सेक्रेटरी डॉ. अमृता नाईक तसेच इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.महिलांवरील हिंसाचाराविरोधात समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे आणि तरुण पिढीमध्ये समानता, सन्मान व सुरक्षिततेचे मूल्य रुजवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

# २१ लाख ७४ हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुंतवणूक केलेल्या रकमेवर कोणताही नफा आणि गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी सहा अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुजवा चक्रवर्ती हे रोडपाली, कळंबोली, सेक्टर १६ येथे राहत असून ते फिल्म इंडस्ट्री मध्ये पोस्ट प्रोडक्शन मार्केटिंग करतात. त्यांना इंस्टाग्रामवर शेअर मार्केट ट्रेंडिंग संदर्भात जाहिरात दिसली. त्या लिंकवर क्लिक केले असता त्यांना व्हाट्सअप ग्रुपवर ऍड करण्यात आले. यावेळी ट्रेंडिंग करायचा असल्यास प वर पैसे टाकावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैसे इन्व्हेस्ट केले आणि ट्रेडिंग सुरू केली. त्यांना दहा हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्यांनी २५००० रुपये पाठवले आणि त्यांना एक लाख रुपये नफा मिळाला.

पैसे अकाउंट वर येतात का हे पाहण्यासाठी त्यांनी बँक खात्यावर रक्कम ट्रान्सफर केली. ते त्यांच्या बँक खात्यावर दिसले. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला आणि त्यांनी आणखी पैसे ट्रान्सफर केले. त्यांना लाखांचा नफा दिसत होता. त्यांनी एकूण २१ लाख ७४ हजार रुपये जमा केले असता पवर एक करोड रुपये दिसून आले. पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला मात्र ते ट्रान्सफर झाले नाहीत. त्यावेळी तुम्हाला दहा लाख रुपये कमिशन भरावे लागतील त्यानंतर ते पैसे खात्यावर जमा होतील असे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.


नमुना क्रमांक ३

**जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल, जिल्हा रायगड**
**श्री. एस. आर.चव्हाण यांचे न्यायालयात**
**जिल्हा न्यायाधीश ४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,**
**पनवेल-रायगड, पनवेल, रायगड.**

जातीने हजर राहण्याबाबत समन्स
(आज्ञावली ५, नियम ३)

दिवाणी किरकोळ अर्ज/८२/२०२३
**डॉ. महाबळेश्वर पी राव वि. राधाबाई हरी खुटरकर तर्फे पदू हरी खुटरकर आणि ११**
**पुढिल तारिख : १९-१२-२०२५**

प्रति,
**मदन ठाकूर**
**मोरबी गाव, खारघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, ४१०२१०.**

ज्याअर्थी **डॉ. महाबळेश्वर पी राव** यांनी तुमच्याविरुध्द बद्दल दावा दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे १९-१२-२०२५ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे, व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज १०-११-२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**जिल्हा न्यायाधीश ४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,**
**पनवेल-रायगड**

"(सूचना- तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठीचा पत्ता न दिल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.)

**ecourts.gov.in या संकेतस्थळावर पुढिल घडामोडींसाठी भेट द्या किंवा "eCourts Services" हे मोबाईल ॲप डाउनलोड करा.**

सदरहू कामगिरी संगणक प्रणाली मधुन अधिकृत वापरकर्त्याद्वारा निर्मित असल्यामुळे प्रत्यक्ष स्वाक्षरी केलेली नाही.



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे चिखले, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक श्री. प्रसाद महादेव कमलाकर आणि श्री. बंटी रामराव राठोड यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडुन कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहु मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापुर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड**

| खाते क्रमांक | भुधारणा पद्धती | सर्व्हे नं. गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| ८५४ | १ | ११९ | ३/अ | ०.१६.७० |
| | | ११९ | ३/ब | ०.०४.८० |
| | | १२० | १/अ/१ | ०.५९.७० |

तरी वर नमुद जमीनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासहित खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री. प्रसाद महादेव कमलाकर आणि श्री. बंटी रामराव राठोड यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहित असल्याबाबत गृहित धरुन त्याप्रमाणे सदरहु मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमीनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडुन दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/१२/२०२५

सही/-
**श्री.विशाल कोंडीबा व्हनमाने**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं. १२०१, वि-टाइम्स स्क्वेअर, भूखंड क्रं. ३, सेक्टर नं. १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई. ४००६१४**
**मो. नं. ८२८६६५१७४७**